# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः उपक्रम २३१५/प्र.क्र.१२२/एस.डी.४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०९ जून,२०१५

**प्रस्तावना :-**

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार प्रत्येक बालकाचे नाव पटावर नोंदवले जाणे आवश्यक आहे. पटावर नोंदवले गेलेले प्रत्येक बालक दररोज शाळेत उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचा हक्क आता कायदयाने मान्य केला आहे.

शाळा बालकांचे भावविश्व घडविते सामाजिक विकासात आणि राष्ट्राच्या जडण घडणीत शाळेचे अव्दितीय स्थान मान्य करावेच लागेल. उक्त अधिनियम २००९ नुसार बालकांना शाळेत प्रवेशीत करून त्याला हसत खेळत आनंददायी शिक्षण देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. शाळातुन दिले जाणारे शिक्षण हे जीवनदायी आहे अशी शिक्षण हक्क कायद्याची फलनिष्पत्ती आहे. दर्जेदार शिक्षणासाठी शासन कटिबध्द असून प्रत्येक मुल पटावर नोंदवले जाऊन ते नियमित शाळेत येणे यासाठी राज्यभर विविध स्तर आणि पातळयांवर नवोपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

दीर्घ सुटयांच्या आनंदानंतर विद्यार्थी जेव्हा शाळेत येतील तेव्हा त्यांना त्यांची शाळा हवीहवीशी वाटली पाहिजे. शाळा परिसर स्वच्छ, सुंदर आणि प्रेरणादायी असल्यास सुट्टयानंतर बालकांना शाळेची ओढ लागेल. शिक्षक आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी शाळा पूर्व दिनी शालेय व्यवस्थापन समिती आणि गावातील /वार्डातील युवक युवती मंडळे बचतगट यांच्या सहकार्यातून उपलब्ध संसाधनाच्या साहयाने शाळा परिसर स्वच्छ करून,सडा टाकून, रांगोळी काढून गावातील उपलब्ध फुले आणि पानांची तोरणे बांधून वर्ग खोल्यांना सुशोभित करून शाळा सुशोभित केल्यास विद्यार्थ्यांना शाळा अधिकाअधिक आवडू लागतील.

दिनांक १५ जून २०१५ रोजी राज्यात शाळा प्रारंभ होत आहेत. हा प्रारंभ चैतन्यमय आणि उत्साहवर्धक झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळते ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन राज्यात "शाळा प्रवेशोत्सव" मोठया उत्साहात आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालील शासन निर्णय निर्गमीत करण्यात येत आहे.

## शासन निर्णय :-

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरू होण्याच्या प्रथम दिवशी सर्व शाळांमध्ये नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा प्रवेशोत्सव हा कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय

शासनाने घेतला आहे. हा कार्यक्रम विदर्भामध्ये दिनांक २६ जून २०१५ व उर्वरित महाराष्ट्रात दिनांक १५ जून २०१५ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

२. या कार्यक्रमाचे स्वरूप खालीलप्रमाणे राहिल.

i. शाळा सुरू होण्याच्या पुर्वदिवशी शिक्षकांनी शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था तसेच स्थानिक सेवाभावी संस्था (युवक मंडळे, क्रीडा मंडळे,बचत गट,महिला मंडळे,जेष्ठ नागरिक संघ )यांच्या सहकार्याने शाळेत नव्याने प्रवेशित होणाऱ्या बालकांच्या घरी भेट देणे, पदयात्रा व शाळा परिसर स्वच्छता /सुशोभीकरण करावे याबाबत सविस्तर तपशील परिशिष्ट - अ प्रमाणे राहिल.

ii. शाळा सुरू होण्याच्या दिवशी शिक्षकांनी वेळेवर उपस्थित राहुन प्रभातफेरी आयोजन, विद्यार्थ्यांचे फूले देवून स्वागत, मोफत पुस्तक वितरण इ. कार्यक्रम आयोजित करावेत. यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था तसेच स्थानिक सेवाभावी संस्था (युवक मंडळे, क्रीडा मंडळे, बचत गट, महिला मंडळे,जेष्ठ नागरिक संघ) यांचे सहकार्य घ्यावे. सविस्तर तपशील परिशिष्ट - ब प्रमाणे राहिल.

iii. शाळा सुरू होण्याच्या दिवशी शिक्षक, क्षेत्रीय अधिकारी यांनी वेळेवर उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याची विनंती शाळा असणाऱ्या गाव / प्रभागात निवास असणाऱ्या स्थानिक ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या सदस्य / पदाधिकाऱ्यांना करण्यात यावी. या प्रमाणे सदस्यांचे निवासस्थान परिसरात शाळा असणाऱ्या गाव/ प्रभागात नसल्यास स्थानिक ग्रामपंचायतीचे सरपंच / उपसरपंच तसेच जेष्ठ सदस्य यांचेव्दारा स्वागत करावे.

iv. जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी जिल्हयाचे संसद सदस्य, पालकमंत्री महोदय व स्थानिक मंत्री महोदय यांना जिल्हयातील एका शाळेत या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याची विनंती करावी.

v. गट शिक्षणाधिकारी / शिक्षणाधिकारी म.न.पा. यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील संसद सदस्य व विधीमंडळ सदस्य यांना जिल्हयातील एका शाळेत या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याची विनंती करावी.

vi. या कार्यक्रमाची व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी.

vii. सर्व जिल्हा शिक्षणाधिकारी, उपसंचालक, सहसंचालक, संचालक, डायट प्राचार्य यांनी किमान एका शाळेवर उपस्थित राहावे.

viii. शिक्षण विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी राज्य शासनाच्या इतर विभागातील वर्ग २ व त्यावरील अधिकाऱ्यांना या कार्यक्रमासाठी शाळा निहाय निमंत्रित करावे.

ix. शाळेच्या प्रथम दिवशी मध्यान्ह भोजन योजनेतील जेवणात गोड पदार्थाचा समावेश करावा.

x. शाळेच्या प्रथम दिवशी स्थानिक कलाकार अथवा माजी विद्यार्थी यांनी शिक्षणाबाबत सांस्कृतिक कार्यक्रम करणार असतील तर त्यास प्रोत्साहन दयावे.

xi. या कार्यक्रमासाठी येणारा खर्च सादिलनिधी तसेच सर्व शिक्षा अभियानाच्या निधीतून भागविण्यात यावा.

xii. शाळा प्रवेशोत्सवामध्ये विद्यार्थीकेंद्रीत कार्यक्रम घेण्यात यावेत व शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाचा कालावधी जास्तीत जास्त एक तास असावा, नंतर दैनंदिन कामकाजास सुरुवात करावी.

xiii. दिनांक १४/०६/२०१५ व दिनांक २५/०६/२०१५ रोजीचा कार्यक्रम १००० ते ५००० एवढी लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये राबविला जावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६०९१६३४५३४९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: CN = Ramchandra Ganpat Gunjal, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.06.09 17:42:22 +05'30'

**रा.ग.गुंजाळ**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री, (शालेय शिक्षण)
४. मा.मंत्री, यांचे खाजगी सचिव (सर्व)
५. मा.राज्य मंत्री, खाजगी सचिव (सर्व )
६. मा. मुख्य सचिव, यांचे स्विय सहाय्यक
७. मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
८. मा प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
९. आयुक्त, शिक्षण, पुणे
१०. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
११.शिक्षण संचालक, सर्व

१२.विभागीय आयुक्त, सर्व

१३.विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व

१४.जिल्हाधिकारी, सर्व

१५.आयुक्त महानगरपालिका सर्व

१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व

१७.शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर शिक्षण), शिक्षण निरीक्षक (उत्तर/पश्चिम/दक्षिण)

१८. गटशिक्षणाधिकारी, सर्व

१९.सर्व उप/सहसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

२०. सर्व अवर सचिव, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,

२१. निवड धारीका एस.डी.४ कार्यासन.

**शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : उपक्रम २३१५/(१२२/१५)-एस.डी.४, दिनांक -- जून,२०१५चे सहपत्र**

**शाळा पूर्व तयारी आणि पूर्वदिनी घरभेटी शैक्षणिक पदयात्रा**

**परिशिष्ट अ**

| अ.क्र. | दिवस | वेळ | उपक्रम |
|---|---|---|---|
| १ | शाळा पूर्व दिवस दिनांक १४/६/२०१५ दिनांक २५/६/२०१५ | प्रात- ७.००वा | सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांसह शिक्षकांचे शाळेत आगमन प्रवेशापात्र बालकांची यादी ग्रामपंचायत व शाळा फलकावर प्रदर्शीत करणे |
| २ | | सकाळी ७.०० ते ७.३० वा. | ध्वनीवधेकावर (लाऊड स्पीकर) उद्या आपल्या सर्व बालकांना सकाळी ७.००.वा.शाळेत पाठविण्याची विनंती करण प्रवेशपात्र बालकांची यादी लाउडस्पीकरवरून घोषित करणे गाव किंवा वार्ड मोठा असेल तर दोन किंवा तीन शिक्षकांचा गट तयार करुन घरभेटी,शैक्षणिक पदयात्रा काढावी.गावातील/वार्डातील प्रत्येक घरापर्यंत कुणीतरी जाणे अपेक्षित आहे. |
| ३ | | सकाळी ७.०० ते ७.३० वा. | सरपंच गावकरी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य युवक-बचत गट ज्येष्ठ नागरिकांसह गावातील/वॉर्डातील प्रत्येक घरांना प्रत्यक्ष भेट देणे. घरात प्रवेशपात्र बालक असेल तर या पदयात्रेव्दारा घरी जाऊन प्रवेश पात्र बालकांचे प्रवेश अर्ज भरुन घेणे. उद्या शाळा सुरु होत असल्याचे सांगून उद्या आपल्या सर्व बालकांना सकाळी ७.००.वा.शाळेत पाठवण्याची विनंती करणे.गाव किंवा वॉर्ड मोठा असेल तर दोन किंवा तीन शिक्षकांचा गट तयार करुन घरभेटी,शैक्षणिक पदयात्रा काढावी.गावातील/वॉर्डातील प्रत्येक घरापर्यंत कुणीतरी जाणे अपेक्षित आहे. |
| ४ | | सकाळी ९.०० ते १०.३० वा. | युवकांच्या, गावकऱ्यांच्या बचत गटाच्या सहाय्याने शाळा परिसर स्वच्छ करणे,सडा शिंपून रांगोळी काढणे, आंब्याच्या किंवा उपलब्ध असलेल्या पानां-फुलांची तोरणे बांधणे, ध्वनीवर्धकावर देशभक्तीपर गीत वाजवणे(लावणे). |

शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक :- उपक्रम २३१५/(१२२/१५)-एस.डी.४,

दिनांक - जून,२०१५चे सहपत्र

## शाळेच्या पहिल्या दिवशी करावयाची कार्यवाही

## परिशिष्ट ब

| अ.क्र. | दिवस | वेळ | उपक्रम |
|---|---|---|---|
| १ | शाळेचा पहिला दिवस दिनांक १५/६/२०१५ दिनांक २६/६/२०१५ | सकाळी- ७.००वा | सर्वानी शाळेत उपस्थित राहणे. शाळेच्या पुर्वदिनी ज्या प्रवेशपात्र बालकांना प्रवेश दिला आहे त्यांची घोषणा करावी व उर्वरित प्रवेशपात्र बालकांची नावे लाऊडस्पीकरवर घोषीत करावी व तात्काळ प्रवेश घेण्याचे पालकांना आवाहन करावे. |
| २ | | सकाळी ७.०० ते ७.३० वा. | गावात/वॉर्डात देशभक्तीपर गीते/गात,नारे देत बालकांची प्रभातफेरी काढणे,युवक,गावकरी,ज्येष्ठ नागरिकांना प्रभातफेरी मध्ये सहभागी होण्याची विनंती करणे |
| ३ | | सकाळी ८.०० ते ९.०० वा. | पुस्तक दिनानिमित्त शालेय व्यवस्थापन समितीच्या उपस्थितीत सर्व बालकांना मोफत पाठयपुस्तकाचे वितरण करणे इ.१ ली मध्ये प्रवेश घेतलेल्या बालकांचा उपलब्ध असलेली फुले देऊन पदाधिकाऱ्यांच्या हस्ते स्वागत/कौतुक करणे. |
| ४ | | सकाळी ९.०० ते १०.०० वा. | वर्षभर १०० टक्के उपस्थिती ठेवण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची माहिती देणे.एकही विद्यार्थी शाळाबाहेर राहणार नाही याची सर्वांना प्रतिज्ञा देणे. |
| ५ | | सकाळी १०.००वा. | १०० टक्के उपस्थितीसह प्रत्यक्ष वर्गाध्यापनास प्रारंभ करणे. |